| MHLA130004612025 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | २९/०४/२०२५ | | |
| | नोंदणी दिनांक | : | २९/०४/२०२५ | | |
| | निकाली दिनांक | : | १०/०८/२०२६ | | |
| | कालावधी | : | व. | म. | दि. |
| | | | १ | ३ | १२ |

**न्यायदंडाधिकारी वर्ग १ (न्यायालय क्र.१) रेणापूर ता.रेणापूर जि. लातूर यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी श्रीमती पूजा आनंद आपटे)**

(दि.१० ऑगस्ट २०२६ रोजी पारीत)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १४४/२०२५**

**(निशाणी क्र. १३ लगत)**

(रेणापूर पोलिस स्टेशन, गु. र. नं.९०/२०२५, म.प्रो.का.कलम ६५(अ)(ई) अन्वये )

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | – | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस निरीक्षक, रेणापूर पोलीस ठाणे |
| अभियोगपक्षातर्फे | – | श्री.जे.आर. शेख, सहा. सरकारी अभियोक्ता. |
| तक्रारदार | – | राजेंद्र मथूरदास घोगरे<br>वय– ५० वर्षे, धंदा– पोना १०२३<br>नेमणुक –रेणापूर पोलिस स्टेशन, ता. रेणापूर<br>जि. लातूर |
| आरोपी | – | १. रामराव यशवंत सिरसाट<br>वय – ४८ वर्ष, धंदा – मजुरी,<br>रा. फावडेवाडी ता. रेणापूर जि. लातूर |
| आरोपींतर्फे | – | श्री. ए.एम.केंद्रे विधीज्ञ |
| गुन्हा घडल्याची तारीख | – | दि.२२/०३/२०२५ |
| प्रथम खबरची तारीख | – | दि.२३/०३/२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | – | दि.२९/०४/२०२५ |
| गुन्हाचा तपशील ठेवल्याची तारीख | – | दि. ११/११/२०२५ |
| पुरावा आरंभ केल्याची तारीख | – | दि. ०५/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | – | नाही. |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख | – | दि.१०/०८/२०२६ |
| शिक्षा असल्यास, आदेशाचा दिनांक | – | नाही. |

**(आरोपीचा तपशिल)**

| अ.क्र. | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | शिक्षा दिली किंवा निर्दोष सोडले | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता संपरिक्षेदरम्यान तुरुंगात असल्यास तो कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रामराव यशवंत सिरसाट | भा.ना.सु.सं कलम ३५ (३) प्रमाणे नोटीस | भा.ना.सु.सं कलम ३५ (३) प्रमाणे नोटीस | महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(अ) (ई) अन्वये | निर्दोष सोडले | नाही. | नाही. |

**(अभियोग पक्षाचे साक्षीदारांची यादी)**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | साक्षीदाराची भुमीका |
|---|---|---|
| सा.क्र.१ | सचिन गोविंद मुळे | जप्तीपंच |

**(अभियोग पक्षाचे कागदपत्रे )**

| अ.क्र. | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | नाही. | नाही. |

**(आरोपी पक्षाचे कागदपत्रे )**

| अ.क्र. | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | नाही. | नाही. |

## न्या य नि र्ण य

(दिनांक १०/०८/२०२६ रोजी अधिघोषित)

**१.** आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(अ)(ई) अन्वये दोषारोप ठेवण्यात आलेले आहेत.

**सरकार पक्षाची फिर्याद थोडक्यात खालीलप्रमाणे–**

**२.** दि.२२/०३/२०२५ रोजी १७.४५ वाजताच्या सुमारास फिर्यादी व त्यांचे सोबत पोहेकॉ/१३०८ सारुळे, पोकॉ/५५४ पंडगे, सरकारी वाहनाने अवैध धंदयावर केसेस करणे कामी पोलीस दुरक्षेत्र पानगाव येथुन निघुन बीट भागात माहिती घेत असताना गुप्त फावडेवाडी येथुन फोनद्वारे माहिती मिळाली की, फावडेवाडी गावात एक इसम अवैध दारु विक्री करत आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्यानंतर फिर्यादी यांनी दोन पंचाना बोलावुन घेतले. पंचाना सदर बातमीचा

आशय समजावुन सांगितला. त्याच दिवशी १८.२० वाजता फावडेवाडी येथे एक इसम त्याचे घरासमोरील कोटयाचे समोर रोडवर हातात काळया रंगाची पिशवी घेवून थांबलेला मिळुन आला. फिर्यादीने दोन पंचासमक्ष नाव व गाव विचारुन व त्यांचे जवळ असलेल्या काळया रंगाची पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये देशी दारु टॅगो पंच नावचे कागदी लेबल असलेल्या ९० मी.ली. प्लास्टीकच्या सिलबंद १० बाटल्या प्रती बॉटल ३५ रु प्रमाणे किंमत अंदाजे ३५०/– रुपयेचा मुद्देमाल मिळुन आला. त्यानंतर फिर्यादीने आरोपींविरुद्ध फिर्याद दिली.

३. पोलिस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीप्रमाणे आरोपीच्या विरोधात महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(अ)(ई) अन्वये गुन्हा रजिस्टर नंबर ९०/२०२५ नोंदविण्यात आला. तपासी अंमलदार यांनी मुददेमाल जप्ती व घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि गुन्ह्याचा तपास पुर्ण झाल्यानंतर तपासी अधिकारी यांनी न्यायालयात आरोपी विरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी विरोधात मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५(अ)(ई) अन्वये नि.क्र.१३ वर गुन्हयाचा तपशील निश्चित करुन नोंदविला आणि तो आरोपीला समजावुन सांगितला. आरोपीने गुन्हा नाकबुल करुन न्यायालयाला केस चालविण्याची विनंती केली. त्यानंतर सरकार पक्षाने साक्षीदार क्र.१ सचिन गोविंद मुळे – जप्ती पंच (नि.क्र.१३ लगत) यांना तपासले. वारंवार संधी देवुन ही सरकारपक्षाने इतर साक्षीदार तपासण्याबाबत तजवीज न केल्यामुळे नि.क्र.१ वरील आदेशानुसार सरकारी पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीचे भा.ना.सु.सं. कलम ३५१(१)(ब) चे निवेदन रद्द करण्यात आले.

५. सरकार पक्षाचे आरोपी विरुद्धचे आरोप पाहता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले आहेत, त्यावरील कारणांसहित निष्कर्ष त्यांच्यासमोर दिलेले आहेत.

| <u>अ.क्र.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे शाबित करतो काय की, दि. २२/०३/२०२५ रोजी १८.२० वाजताच्या सुमारास फावडेवाडी गावात आरोपी त्याचे ताब्यामध्ये देशी दारुच्या टॅगो पंच कंपनीच्या ९० मी.ली. मापाच्या १० बाटल्या एकुण अंदाजे रक्कम रु.३५०/– किंमतीचा मुद्देमाल विनापरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगताना मिळुन आले ? | ...नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## **–: का र ण मि मां सा :–**

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत:–**

६. दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकला. सदर प्रकरणात अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे फावडेवाडी या गावात आरोपी आपल्या ताब्यामध्ये देशी दारुच्या टॅगो पंच नावाचे कागदी लेबल असलेल्या ९० मी.ली. मापाच्या १० बाटल्या एकुण अंदाजे रक्कम रु.३५०/– किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला. आरोपी सदरची दारु विक्रीसाठी बाळगुन होता. त्यामुळे अभियोग पक्षाला सदर जप्त मुद्देमाल हा देशी दारु होती व तो आरोपीच्या ताब्यातुन जप्त केला गेला या बाबी सिद्ध करायच्या आहेत. त्यासाठी सी.ए. रिपोर्ट सिद्ध होणे गरजेचे आहे.

७. सरकार पक्षाने आरोपी विरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी एक साक्षीदार तपासला. साक्षीदार क्र.१ सचिन गोविंद मुळे जप्ती पंचनाम्यावरील साक्षीदार असुन त्याने सरकारीपक्षास सहाय्य होईल अशी साक्ष न दिल्यामुळे त्यांना फितुर घोषीत करुन उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आले. उत्तरसुचक प्रश्नावली दरम्यान देखील आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होईल ही बाब अभिलेखावर आणण्यास सरकारी पक्ष असमर्थ ठरलेला आहे.

८. सरकार पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराच्या साक्षीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सरकार पक्षातर्फे फिर्याद शाबीत करण्यात आलेली नाही. पंच साक्षीदाराने सरकारी पक्षास सहाय्य होईल अशी साक्ष न दिल्यामुळे जप्ती पंचनामा निशंकपणे सिध्द झाला असे म्हणता येणार नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यात देशी दारु मिळुन आली ही बाब सरकारपक्षाने शाबीत केलेली नाही.

९. अभियोग पक्षाने दाखल केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता, सदर प्रकरणात सरकार पक्षाने रासायनिक पृथकरणाचा अहवाल दाखल केलेला आहे. सदर अहवालानुसार जप्त मुद्देमालामध्ये ४१.५२ % अल्कोहोलचे प्रमाण आढळुन आले. परंतु वर नमुद केल्याप्रमाणे आरोपीच्या ताब्यातुन मुद्देमाल जप्त करण्यात आला ही बाब सरकारपक्ष सिध्द करु शकला नसल्यामुळे रासायनिक अहवाल हा प्रस्तुत गुन्हयाशी संबंधीत आहे असे स्पष्ट होत नाही.

१०. वरील सर्व बाबींचा विचार करता घटनेच्या दिवशी आरोपी त्याचे ताब्यात देशी दारु बाळगुन होती ही बाब संशयापलिकडे सिद्ध होत नाही. त्यामुळे संभ्रमाचा फायदा आरोपीच्या पक्षात राहतो. साक्षीदाराच्या साक्षीमधुन आरोपीविरुद्ध कोणताही गुन्हा शाबित होवु शकलेला नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी देवुन मुद्दा क्र. २ च्या उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| १. | आरोपी रामराव यशवंत सिरसाट, यांची महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (अ)(ई) चे दोषारोपातुन फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) (भा. ना.सु. संहिता कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचे जामिनपत्र रद्द करण्यात येते. |
| ३. | आरोपीनी अपिलीय न्यायालयात हजर राहणेकरीता रक्कम रु.१५,०००/– वैयक्तिक जातमुचलका फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ (भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१) अन्वये सादर करावा. |
| प्रस्तुत | प्रकरणात जप्त करण्यात आलेला देशी दारु टॅगो पंच कंपनीच्या ९० मी.ली. मापाच्या १० सिलबंद बाटल्या पुर्वी विल्हेवाट लावल्या नसतील तर त्या राज्य उत्पादन शुल्क विभाग, लातूर यांच्याकडे पाठविण्यात याव्यात. |

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केले.)**

Digitally signed by POOJA ANAND APTE
Date: 2026.08.10 16:31:37 +0530

**ठिकाण–रेणापूर**
**दिनांक: १०/०८/२०२६**

**( पूजा आनंद आपटे )**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, रेणापूर**